सांगली - कोल्हापूर - मुंबई

नवे विचार...नवी सुरुवात

दैनिक

# हॅलो प्रभात

■ RNI NO. MAHMAR/2020/79996

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ९१ ■ शनिवार, ०५ जुलै २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




## संक्षिप्त...

### नृसिंहवाडीत दुसऱ्यांदा 'दक्षिणद्वार सोहळा'



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

अवघ्या सहा दिवसांतच कृष्णामाईने पुन्हा एकदा रौद्र- रूप धारण करत दत्त चरणी आपली सेवा रुजू केली. आज शुक्रवारी (दि. ४) पहाटे नदीची पाणीपातळी ३१ फूट ५ इंचांवर पोहोचताच, या वर्षातील दुसरा 'दक्षिणद्वार सोहळा' हजारो भाविकांच्या साक्षीने अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

### भूस्खलन सौम्यीकरणाचा प्रस्ताव धूळ खात

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जिल्ह्यात मानवी वस्तीजवळ असलेला भूस्खलनाचा धोका कमी करण्यासाठी १३ गावांत सौम्यीकरणाच्या कामांचा पाठवलेला प्रस्ताव वर्ष होत आले, तरी धूळ खात पडला आहे. एखाद्या ठिकाणी दुर्दैवाने दरड कोसळली, दुर्घटना घडली तरच शासन जागे होणार का? असा सवाल विचारला जात आहे. जिल्ह्यातील ८६ गावांना भूस्खलनाचा धोका आहे. दरड कोसळणे, भूस्खलन होणे या प्रकारांत जिल्ह्यात वाढ होत चालली आहे.

### कर वेळेत भरणाऱ्यांना बक्षीस

**सातारा : हॅलो प्रभात**

ग्रामविकास आणि लोकसहभाग याला प्रोत्साहन देणारा आगळा-वेगळा उपक्रम तासवडे ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. दीपाली जाधव यांच्या पुढाकारातून राबवण्यात आला आहे. दीपाली जाधव यांनी आपल्या सरपंच मानधनातून वेळेवर कर भरणाऱ्या ग्रामस्थांचा सन्मान करत लकी ड्रॉ काढून बक्षीस वितरणही केले. लकी ड्रॉ चे बक्षीस वितरण कराड पंचायत समितीचे गटविकास अधिकार प्रताप पाटील, माळी, अमित जाधव, मृणालिनी मोहिते, माजी सरपंच संग्राम पवार, उमेश मोहिते, उपसरपंच मनिषा जाधव, ग्रा.स.सुभाष जाधव, भारती शिंदे,लता जाधव, कृष्णा देशमुख, ग्रामसेवक महादेव जाधव यांच्या हस्ते २० करदात्यांना २० हजार रुपयांची बक्षीसे देण्यात आली.

### डेंग्यूचा धोका कायम

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

महापालिकेच्या आरोग्य विभाग व आशा वर्कर्स यांच्या माध्यमातून शहरात गुरुवारी ३,६९४ घरांची तपासणी करण्यात आली. यामध्ये ३९ घरांमध्ये डेंग्यू पसरवणाऱ्या डासांच्या अळ्या आढळून आल्या. साथरोग विभागामार्फत कावीळ व डेंग्यूवरील दैनंदिन सर्वेक्षण सुरू आहे. या तपासणीत एकूण १५,५८२ नागरिकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली, यामध्ये १४ तापाचे रुग्ण आढळले, तसेच २ नागरिकांचे रक्तजल नमुने तपासणीसाठी घेण्यात आले.

### पंचगंगेच्या पातळीत वाढ

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

धरणपाणलोट क्षेत्रातील पाऊस आणि धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे येथील पंचगंगा नदीची पाणी पातळी संथ गतीने वाढत आहे. बुधवारी दुपारी पाणी पातळी ५६ फुटावर स्थिरावली होती. मात्र रात्रीतून पातळी ५६.६ फुटावर पोहचली आहे.

# 'जय गुजरात' म्हणणारे शाहांचे गुलाम!

## हर्षवर्धन सपकाळ ; एकनाथ शिंदेंनी बाळासाहेब ठाकरेंची शिकवणही धुळीस मिळवली



**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभीमानाचा प्रदेश आहे. स्वराज्यासाठी शिवरायांनी सुरतेवर स्वारी केली होती पण आज छत्रपती शिवरायांच्या राज्यात एकनाथ शिंदेंसारख्या गुलामांनी महाराष्ट्राचा स्वाभिमान गुजरातकडे गहाण ठेवला आहे. सत्तेसाठी लाचार झालेला माणूसच महाराष्ट्रातील कार्यक्रमात जय गुजरात ची घोषणा देऊ शकतो. पण स्वाभिमानी मराठी माणूस हे कदापी सहन करणार नाही, असा घणाघात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

एकनाथ शिंदे यांच्या विधानाचा खरपूस समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फोडून पक्ष व चिन्ह गुजरातच्या मालकाने शिंदेंना दिले व मुख्यमंत्रीपदी बसवले



त्या शिंदेच्या तोंडून मोदी शाह स्तुती करणे समजू शकतो पण आपल्या गुजराती मालकाला खूष करण्यासाठी चक्क जय गुजरात म्हणावे एवढी लाचारी बरी नव्हे. अमित शाह यांचा 'वफादार' शिलेदार होण्याच्या नादात एकनाथ शिंदे यांनी आज महाराष्ट्राची मान शरमेने खाली घातली. महाराष्ट्राच्या सत्तेत एकापेक्षा एक नमुने बसलेत हे पुन्हा एकदा दिसले. एकनाथ शिंदे गुजरातचे नाही महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत याचा त्यांना विसर पडला का ? असा सवाल करत महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्या एकनाथ शिंदे यांनी राजीनामा द्यावा, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

मुंबई व महाराष्ट्र विकून गुजरातची तिजोरी भरण्याचे काम शिंदे करत आहेत. मागील ११ वर्षात महाराष्ट्रातील उद्योग, संस्था, कार्पोरेट ऑफिसेस आणि कोट्यवधी निधी हा फडणवीस आणि शिंदेंमुळेच गुजरामध्ये जात आहेत. वेदांता फॉक्सकॅान सारखे मोठे प्रकल्प ज्यामुळे महाराष्ट्रात लाखो तरुणांना रोजगार मिळणार होता तो गुजरातला पाठवून दिला. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करत आहेत, तरुणांना रोजगार नाहीत, महिला सुरक्षित नाहीत, कुपोषण वाढले आहे पण सत्तेतील हे लाचार गुजरातची गुलामी करण्यात व्यस्त आहेत. अशा महाराष्ट्रद्रोह्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नाही, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## 'राजारामबापू' शेतकऱ्यांना अद्यावत तंत्रज्ञान उपलब्ध करून देणारा कारखाना : प्रतिक पाटील

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याने संपूर्ण देशात सर्वप्रथम आपल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे औषध फवारणी आणि मल्टी स्पेक्ट्रम ड्रोनसारखे अद्यावत तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. जगातील आधुनिक तंत्रज्ञान आपल्या शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचा माझा कायम प्रयत्न राहील, असा विश्वास राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांनी व्यक्त केला. ते वाळवा तालुक्या तील तांदुळवाडी, मालेवाडी, +भरतवाडी, कणेगाव, बहादूरवाडी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद व संपर्क दौऱ्यात बोलत होते.



जेष्ठ संचालक प्रताप पाटील, शैलेश पाटील, हणमंत माळी, राजकुमार कांबळे, संचालिका डॉ.सौ.योजना शिंदे-पाटील, सचिव डी.एम. पाटील, बांधकाम अभियंता प्रेमनाथ कमलाकर, जलसिंचन अधिकारी जे.बी. पाटील, ऊस पुरवठा अधिकारी नितीन पाटील, गटाधिकारी संग्राम पाटील, विकास कदम या दौऱ्यात सहभागी झाले होते.

प्रतिक पाटील म्हणाले, लोकनेते राजारामबापू पाटील यांनी साखराळेच्या माळावर साखर कारखाना उभा करून वाळवा तालुक्याच्या विकासाला चालना दिली आहे. आ.जयंतराव पाटील यांनी कारखान्याची प्रगती करताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित सातत्याने जपले आहे. गेल्या ५०-५५ वर्षापासून आपण व साखर कारखान्यात एक ऋणानुबंध निर्माण झाला आहे. तो जपण्याचा,वाढविण्याचा माझा अखंड प्रयत्न राहील.

यावेळी संचालक प्रताप पाटील, शैलेश पाटील, डॉ.योजना शिंदे-पाटील, तसेच नितीन पाटील यांनी माजी मंत्री आ.जयंतराव पाटील, प्रतिक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या वतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यां साठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

माजी संचालक भिमराव पाटील, अँड.विश्वासराव पाटील, संभाजी पाटील, बाजीराव पाटील, विलासराव देसावळे, बाजीराव बेनाडे, संग्रामसिंह घोरपडे, मंगेश माने, रमेश पाटील, राजाराम पाटील, मालेवाडीच्या सरपंच अस्मिता खवरे,

उपसरपंच राहुल पाटील, अनिता गुरव, यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने या दौऱ्यात सहभागी झाले होते.

## रोटरी क्लबच्यावतीने डॉक्टर्स डे, सीए डे, कृषी दिन साजरा

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

येथील रोटरी क्लब आणि रोटरी क्लब अॅन्सच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर डे, सीए डे, कृषी दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शहर परिसरातील डॉक्टर्स, सीए आणि कृषी क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला.



यावेळी रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष नेमिनाथ कोथळे, उपप्रांतपाल सुदर्शन कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉक्टर्स, सीए, प्रगतिशील शेतकऱ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

यामध्ये डॉक्टर गुरुप्रसाद देसाई, अनिरुद्ध माने, लक्ष्मीकांत तोष्णीवाल, रमेश जठार, अभिजीत कलवडे, श्रीधर जाधव, पल्लवी मोरे, प्रतीक्षा घोदे, निहारिका मगदूम, चार्टर्ड अकौंटट सुशांत देवनाळ, विनय झंवर, भालचंद्र ठिगळे तर कृषी क्षेत्रातील धोंडीराम कटघर, बाळासाहेब रुग्गे, रायगोंडा पाटील यांचा समावेश होता.

यावेळी सत्कारमुर्तीनी मनोगत व्यक्त केले तर प्रमुख पाहुणे नेमिनाथ कोथळे, सुदर्शन कदम यांनी शुभेच्छा दिल्या.

## डी.वाय.पाटील चे विद्यार्थी पदव्युत्तर प्रवेश परीक्षेत 'टॉप ५०' मध्ये

**तळसंदे : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र कृषी संशोधन परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या पदव्युत्तर सामायिक प्रवेश परीक्षेत डॉ. डी. वाय. पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदेच्या २१ विद्यार्थांनी राज्यात 'टॉप ५०' मध्ये स्थान मिळवले आहे.




या परीक्षेमध्ये महाविद्यालयाच्या निर्जला देसाई आणि भूषण पवार यांनी राज्यात ११ वा क्रमांक मिळवला आहे. या यादीत पहिल्या ५० क्रमांकामध्ये वसुधा गावडे (१४ वी), श्रेया पाटील (१६ वी), वैष्णवी बोनगे (१८ वी), ऋतिक पवार (२० वा), अनिकेत सरपणे व ऋतुजा शिंदे (२२ वी), श्रद्धा पाटील (२७ वी), श्रुती गणेशकर व रणजीत कारंडे (२८ वा), आश्लेषा एकशिंगे, गिरीश बोरसे, मयुरी जाधव (२९ वी), तृप्ती पाटील (३० वी), शिवानी यादव (३२ वी), सई पाटील (३९ वी), श्रुतिका शिवतरे (४० वी), दिपाली जगताप (४१ वी), तेजश्री राजे व कोमल अदाते (४७ वी) यांनी स्थान मिळवले आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. डी. एन. शेलार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, महाविद्यालयात सुरुवातीपासूनच पदव्युत्तर प्रवेश परीक्षेसाठी विशेष अभ्यासक्रम, टेस्ट सिरीज, मार्गदर्शन सत्रे आयोजित केली जातात. यासोबतच माजी विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाचा मोठा फायदा विद्यार्थ्यांना होतो. यावेळी या परीक्षेत आमच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले याचा अभिमान आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील व कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी अभिनंदन केले आहे.

# तासगावचं राजकारण विचित्र वळणावर!

### संजयकाकांची सत्वपरिक्षा भाजपला अच्छे दिन?

**सांगली/तासगाव : हॅलो प्रभात**

महायुतीने सांगली जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'स्वबळा' वर लढविण्याचा निर्णय घेतला तर मात्र जिल्ह्याचे राजकारण चमत्कारिक वळणावर जाणार आहे. एकाच वर्षात झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये पराभव झाल्याने, आता उंबरठ्यावर आलेली तासगाव पालिकेची निवडणूक संजयकाका पाटील यांच्यादृष्टिने सत्वपरिक्षा बनली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला रामराम करून अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेले माजी खासदार संजयकाका पाटील आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आ. रोहित पाटील या दोन दिग्गजांमध्ये लढत होण्याचा अंदाज बांधण्यात येत असला तरी तासगाव पालिका निवडणूक संजयकाकांच्या दृष्टिने सत्वपरिक्षाच असून दोन राष्ट्रवादीमध्ये झुंज असली तरी मतविभाजनाचा फायदा होऊन तासगाव पालिका निवडणुकीत भाजपला अच्छे दिन येण्याची शक्यता राजकीय जाणकारांमध्ये व्यक्त केली जात आहे. २०१७ साली झालेल्या तासगाव

## 'कुरूक्षेत्र' सजले तासगाव नगरपालिकेचे





पालिकेच्या निवडणुकीत संजयकाका पाटील यांच्या नेतृत्वाखालील भाजपने २१ जागांपैकी तब्बल १३ जागांवर विजय मिळवून सत्ता मिळिवली होती, तर राष्ट्रवादी काँग्रेसला ८ जागांवर समाधान मानावे लागले होते. तत्पुर्वी २०१२ ते २०१७ सालीही संजयकाका पाटील यांच्या गटाचीच पालिका निवडणुकीत सरशी होती. लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर विधानसभा निवडणुकीसाठी अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून संजयकाका पाटील यांनी 'कमळ' सोडून हातात राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ बांधले आता तासगाव पालिकेसाठी अजितदादांची राष्ट्रवादी, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि भाजप अशी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

खा. संजयकाका यांनी भाजप सोडल्यामुळे तासगाव पालिका निवडणुकीची धुरा पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. भाजपच्या जेष्ठ पदाधिकाऱ्यांना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ताकद दिल्यामुळेच भाजपच्या प्रदेश किसान सेलचे संदीप गेंडे-पाटील, तालुकाध्यक्ष सावर्डेचे स्वप्निल पाटील यांना बळ आले असून त्यांनी व्यूहरचनेला प्रारंभही केला आहे. तथापि अजितदादांच्या छावणीत मात्र अद्याप स्मशान शांतताच आहे.संजयकाका पाटील यांच्या खासदारकीच्या कारकिर्दीत तासगाव पालिकेच्या सत्तेत भाजप असतानाही भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांना कधी सत्तेची चव चाखता आली नाही,

तेच जेष्ठ भाजप पदाधिकारी आता पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या छत्रछायेखाली शड्डू ठोकून मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. तीन वर्षे प्रशासकराज राहिलेल्या तासगाव नगरपालिका निवडणुकीचे वेध आता इच्छुकांनाही लागले आहेत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आणि पक्षबदलामुळे निर्माण झालेल्या राजकीय स्थितीने संजयकाका पाटील यांच्या राजकीय अस्तित्वाच्या दृष्टीकोनातून तासगाव नगरपालिका निवडणूक महत्वाची असल्याचे राजकीय जाणकारांतून समजले जात आहे.

भाजपच्या कालावधीत संजयकाका पाटील यांच्या गटाने तासगावमधील अनेक प्रलंबित कामांना तसे पाहता पुर्णत्वास नेले. शाळांच्या इमारतीचे काम असो, नगरपालिकेच्या इमारतीचे काम असो, नाट्यगृह असो, अथवा महिलांसाठी कस्तुरबा महिला दवाखाना असो ही उल्लेखनीय कामे त्यांच्या कारकिर्दीत झाली, तथापि आता स्थिती बदलली आहे. विधानसभा निवडणुकीत संजयकाकांना पराभूत करणारे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आ. रोहित पाटील आणि भाजपबरोबर अजितदादांच्या राष्ट्रवादीची लढत आहे.

### दोन्ही राष्ट्रवादींना मतविभाजनाचा धोका

अजितदादांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांच्यातच अल्पसंख्यांक तसेच भाजप विरोधकांची मते विभागली जाण्याची शक्यता व्यक्त आहे. हिंदूत्ववादी एकगठ्ठा मते सुरक्षित ठेवण्यात भाजपला यश आले तर भाजप तिरंगी लढतीत तासगाव पालिकेत कमळ फुलवेल असा अंदाज व्यक्त होत आहे.




# माऊलीच्या दर्शनाची भक्तांना आस

भारतीय संस्कार संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ मानली जाते. येथील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परंपरेने सामाजिक परिवर्तन घडवण्यामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी या संस्कृतीत सामावलेली आहे. विशेषता साधुसंतांनी दिलेली शिकवण संपूर्ण समाजाला अध्यात्मिकतेच्या दिशेने घेऊन जात आहे. धार्मिक व आध्यात्मिक विचारधारेमुळेच राष्ट्राची विविधतेतून एकता दिसून येत आहे.भारत हा एक विशाल व महाकाय देश आहे. येथे विविध धर्माचे लोक एकतेने व स्नेहभावाने राहतात. प्रत्येक धर्माची परंपरा वेगळे असले तरी प्रत्येक जण भारतीय म्हणून एकमेकांच्या धार्मिक कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

भारतात विविध धर्मियांचे सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.विशेषता महाराष्ट्रात आषाढी एकादशीच्या वारीला खूप महत्त्व आहे. पंढरपूरच्या विठ्ठल रुक्माई च्या दर्शनासाठी अतुर झालेले लाखो भाविक मोठ्या उत्साहात वारकरी दिंडीत सहभागी झालेले असतात. आळंदीपासून सुरू झालेल्या या वारकऱ्यांच्या दिंडीत हजारो महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक व विविध क्षेत्रातील असंख्य व्यक्तींचा यामध्ये सहभाग असतो. भारतीय संस्कृतीचे एक अनोखे दर्शन या निमित्ताने अनुभवाला मिळते. संपूर्ण महाराष्ट्रात विठ्ठल रुक्माई च्या जय घोषाने वातावरण पूर्णपणे भक्तीमय होऊन गेलेले असते.

प्रत्येक शाळा महाविद्यालय यामधील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने वारकरी दिंडी मध्ये सहभागी होतात. विशेषता स्कूलमध्ये लहान लहान मुले विठ्ठल रुक्माईच्या पोशाखात आपल्या अनोख्या धार्मिक संस्कृतीचे दर्शन घडवितात. दरवर्षी गौरीशंकरच्या डॉ. पी. व्ही. सुखात्मे इंग्लिश मीडियम स्कूल,लिंब व खटाव येथील सनशाईन इंग्लिश मीडियम स्कूल येथील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने आषाढी एकादशीचा दिंडी सोहळा साजरा करतात. शैक्षणिक ज्ञानाबरोबर भक्तीचा लळा या विद्यार्थ्यांना लागला पाहिजे ही भूमिका घेऊन या स्कूलमधील शिक्षक आषाढी एकादशी दिंडी वारीचे आयोजन करीत असतात.

या वारकरी दिंडीतून खऱ्या अर्थाने उद्याचे नवराष्ट्र घडवणारे भावी पिढी निर्माण होणार आहे. विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोवला, विठ्ठल विठ्ठल कानडा राजा पंढरीचा हे असे असंख्य अभंग गात माऊली माऊलींचा गजर करीत हजारो वारकरी आषाढी एकादशीला पंढरीची वाट धरतात. माऊली माऊली ज्ञानबा तुकाराम सोबतच हर हर महादेवाचा गजर करीत हजारो वारकऱ्यांनी भक्तिमय वातावरणात पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी आतुर झालेले असतात.

ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता विठ्ठलाचा व रुक्मिणीचा जयघोष करीत वारकरी आपला आध्यात्मिक आनंद शोधत असतात. परमात्मा बरोबरच आपल्या कामात भगवंत शोधण्याचा साधूसंतांनी दिलेला विचार पंढरीच्या वारीमध्ये प्रत्येकजण उतरवताना हे वारकरी दिसून येतात. माऊलीची ओढ ही प्रत्येक भक्ताला लागलेली असते. याच प्रेमापोटी वारकरी तहान भूक विसरून माऊलीच्या दर्शनासाठी पंढरीच्या वाटेवर प्रवास करीत असतात. वारकऱ्यांच्या दिंडी सोहळ्यात श्रद्धा भक्तीचा सुरेख संगम अनुभवाला मिळतो.

भक्तीरसात पूर्णपणे न्हाऊन गेलेल्या वारकऱ्यांना फक्त विठ्ठल रुक्मिणीचे दर्शनाचीच ओढ लागली असते. वर्षातून एकदा येणाऱ्या आषाढी एकादशीचे ते वर्षभर वाट पाहत असतात. भगवंताचे नामस्मरण आणि माऊलीचे आकर्षण लाखो वारकरी भक्तांना लागलेले असते. आळंदीच्या तीर्थक्षेत्र पासून महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठलाच्या पंढरपूर तीर्थक्षेत्री दरवर्षी लाखोच्या संख्येने वारकरी मोठ्या भक्ती भावाने पंढरीची पायी वारी करीत असतात. आळंदी ते पंढरपूर पायी वारी करण्याची मोठी परंपरा आहे.


शेकडो वर्षाचा धार्मिक सामाजिक परंपरा या वारकरी दिंडीला लाभली आहे. या वारीत ना कोणी गरीब ना कोणी श्रीमंत सारे जण समान या सूत्रावर आधारित वारीची वाटचाल गेले अनेक वर्षापासून सुरू आहे. साधुसंतांच्या शिकवणीचे तंतोतंत पालन लाखो वारकऱ्यांकडून होत असते. भक्तीरसात न्हाऊन निघालेल्या या वारकऱ्यांना फक्त विठ्ठलाच्या रुक्मिणीच्या भेटीतच मोठे समाधान असते. वारकरी संप्रदायाला खरंतर मोठा वारसा लाभलेला आहे. ही एक अध्यात्मिक चळवळ नाही तर एक सामाजिक समता आणि सहकार्याचे मूर्त स्वरूप आहे.

# भारतातून देवी रोगाचे समूळ उच्चाटन झाल्याचे WHO कडून जाहीर

## कोरोनापेक्षाही महाभयानक रोग...

**हॅलो प्रभात**

**देवी** म्हणजेच पॉक्स कुलातील व्हॅरिओला मेजर आणि व्हॅरिओला मायनर या विषाणूंमुळे होणारा संसर्गजन्य रोग. व्हॅरिओला मेजर या विषाणूंमुळे झालेला देवीचा आजार तीव्र स्वरूपाचा असतो तर व्हॅ. मायनर या विषाणूंमुळे झालेला आजार सौम्य स्वरूपाचा असतो. १९५० पर्यंत जगभर मोठ्या प्रमाणात देवी या रोगामुळे रुग्ण मृत्युमुखी पडत असत. जागतिक आरोग्य संघटनेने जगभर देवी लसीकरणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविल्याने ५ जुलै १९७५ रोजी भारतातून तर १९८० ला संपूर्ण जगातून देवी या कोरोनापेक्षाही महाभयाक रोगाचे उच्चाटन झाले आहे.




### देवीचे विषाणू

देवी हा फक्त मनुष्याला होणारा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाचे संक्रमण देवीबाधित रुग्णाच्या संपर्कातून किंवा रुग्णाच्या वस्तू वापरल्याने होते. या रोगात काही वेळा रुग्णाच्या त्वचेवर फोड येतात. मात्र, रुग्णाची प्रतिकारशक्ती तीव्र असल्यास त्वचेवर फोड येत नाहीत. रुग्णापासून आणि श्वसनमार्गावाटे पसरणाऱ्या विषाणूंपासून हा रोग पसरतो. शरीरात विषाणूंनी प्रवेश केल्यानंतर ते १२-१४ दिवस सुप्तावस्थेत असतात. या दिवसांत विषाणूंची संख्या वाढते. सुप्तावस्थेनंतर रोगाची लक्षणे दिसू लागतात. ताप येणे, थंडी वाजणे आणि स्नायुदुखी ही रोगाची लक्षणे आहेत. त्यानंतर २-३ दिवसांत प्रथम चेहरा आणि खांद्यापासून कोपरापर्यंत त्वचेवर पुरळ उठतात. हळुहळू पुरळ छाती, पोट आणि पाठीवर पसरतात. पुरळ आल्यानंतर ७-१० दिवसांत रुग्णापासून विषाणूसंसर्ग मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. पुरळामध्ये पाण्यासारखा द्रव भरतो आणि १०-१२ दिवसांत पू भरतो. नंतर पुरळांवर खपली धरते आणि ते कोरडे पडतात. मात्र, ज्या ठिकाणची खपली निघाली आहे, तेथे त्वचेवर एक कायमचा व्रण शिलक राहतो. डोळ्यांमध्ये देवीचा संसर्ग झाल्यास कायमचे अंधत्व येते. ५ ते १०% रुग्णांमध्ये पुरळातून आणि नाकातोंडातून रक्तस्राव होतो. ही अतिशय गंभीर अवस्था असून त्यामुळे रुग्ण ७-८ दिवसांत मरण पावतो.

### देवीचे पुरळ

लागण झाल्याच्या सुमारास देवी आणि गोवराचे पुरळ एकसारखेच दिसतात. मात्र, देवीचे पुरळ एकाच वेळी येतात तर गोवराचे पुरळ टप्प्याटप्प्याने येतात. देवीचे पुरळ चेहरा आणि हातावर अधिक प्रमाणात येतात तर गोवराचे पुरळ मात्र चेहरा आणि छाती किंवा पोटावर येतात. गोवर आणि देवीचे पुरळ एकसारखे

## ५ जुलै : भारतासह जगातून देवी रोग उच्चाटन स्मृतिदिन

दिसत असल्याने देवी झाल्याचा संशय आल्यास देवीचे निदान इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाद्वारे करून देवीचा आजार नसल्याची खात्री करून घेण्यात येते. संशयित रुग्णामध्ये पुरळ उठण्याआधी लघवी व रक्तामधील विषाणू आणि पुरळातील द्रवात असलेले विषाणू तपासण्यात येतात. देवी या रोगावर लसीकरण हा एकमेव प्रतिबंधक उपाय आहे. या रोगाची लागण झाल्यानंतर बरे होण्यासाठी एकही उपचार उपलब्ध नाही. देवीवरील उपचारामध्ये रुग्णाला आराम मिळेल असे उपाय केले जातात. तसेच द्वितीय संसर्ग होऊ नये म्हणूनही उपाय केले जातात.

प्राचीन काळात भारत आणि चीनमध्ये लसीकरणाचा प्राथमिक प्रयत्न केला जात होता. ज्या व्यक्तींना देवीचा सौम्य रोग होतो त्यांना देवीचा तीव्र रोग होत नाही, हे या देशांतील लोकांना ठाऊक होते. म्हणून निरोगी व्यक्तीच्या त्वचेवर फोडातील द्रव चोळून किंवा देवीच्या



फोडावरील खपलीची भुकटी नाकावाटे हुंगून या रोगाचा प्रतिबंध करण्याचे प्रयत्न लोक करीत असत. मात्र, या प्रयत्नांमध्ये काही वेळा तीव्र संसर्ग होण्याची शक्यता आढळल्याने नंतर ही प्रथा बंद पडली.

### एडवर्ड जेन्नरने देवीची लस शोधून काढली

१७९८ साली एडवर्ड जेन्नर याने गोवर (काऊपॉक्स) झालेल्या व्यक्तीच्या रक्तरसापासून देवीची लस शोधून काढली. तेव्हापासून देवीच्या रोगाचा प्रसार थांबला. व्हॅक्सिनेशन हा शब्द 'व्हॅक्सि' या डॅनिश शब्दापासून आलेला आहे. लॅटिन भाषेतील व्हॅक्सि म्हणजे काऊ (गाय). गायीसाठी असलेल्या शब्दापासून आणि काऊपॉक्सपासून व्हॅक्सिनेशन हा शब्द रूढ झाला. सामूहिक लसीकरणानंतर जागतिक आरोग्य संघटनेने एप्रिल १९७७ मध्ये भारतातून देवी नष्ट झाल्याचे आणि १९८० साली जगातून देवी हा रोग समूळ नष्ट झाल्याचे जाहीर केले. देवी या रोगावरील सार्वत्रिक लसीकरण आता बंद करण्यात आले आहे.

भविष्यात पॉक्स विषाणूंमध्ये जनुकीय बदलाने मानवी संसर्ग झाल्यास उपचार करणे शक्य व्हावे म्हणून जगातील दोन प्रयोगशाळांमध्ये सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन (अॅटलांटा, जॉर्जिया, अमेरिका) आणि रशियन स्टेट सेंटर फॉर रिसर्च ऑन व्हायरॉलॉजी अँड बायोटेक्नॉलॉजी, (रशिया) येथे देवीचे विषाणू अधिकृतपणे जतन केले आहेत.

# जगात सर्वाधिक पुस्तके लिहिण्याचा रेकॉर्ड करणारे प्रतिभावान रहस्यकथाकार

**हॅलो प्रभात**

**चं**द्रकांत सखाराम चव्हाण उर्फ बाबूराव अर्नाळकर यांचा आज ५ जुलै स्मृतिदिन. चंद्रकांत चव्हाण हे बाबूराव अर्नाळकर या टोपणनावाने लिहिणारे मराठी लेखक, रहस्यकथाकार होते. त्यांचा जन्म ९ जून १९०६ रोजी झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले.

१९४२ च्या चळवळीत तुरुंगात असताना 'सामान्य माणसासाठी लिही' असे बाबूरावांना सांगण्यात आले. सामान्य माणसाकरिता लिहायचे म्हणजे काय हे बाबूरावांना पडलेले कोडे होते. बाबूरावांना नाटकाची आवड होती. एका नाट्यक्लबाचे ते सभासद होते. त्या नाट्यक्लबातून ते एकदा विजयदुर्ग किल्ल्यात गेले आणि परत आल्यावर त्यांनी 'सतीची समाधी' नावाची गोष्ट लिहिली; ती अस्नोडकरांच्या 'करमणूक'मधून प्रसिद्ध झाली. त्याच दिवशी बाबूरावांना नाटककार अच्युत बळवंत कोल्हटकर भेटले. छान गोष्ट आहे, असे ते म्हणाले. एका मोठ्या माणसाला तुझी गोष्ट खूप आवडली आहे असे म्हणून ते बाबूरावांना नाथ माधव यांच्याकडे घेऊन गेले. नाथ माधवांनी अशाच रहस्यकथा लिही असे सुचवले. बाबूरावांनी मग लेखणी हाती घेतली, ती अखेरच्या श्वासापर्यंत खाली ठेवली नाही. त्यांनी एकूण १०४२ रहस्यकथा लिहिल्या. खऱ्या अर्थाने त्यांनी तळागाळातल्या माणसांना मराठी वाचनाची गोडी लावली. 'चार आणे माला'पासून त्यांनी सुरुवात केली. त्यांचे 'नायक', 'झुंजार', 'धनंजय-छोटू', 'मेजर सुदर्शन', 'इन्स्पेक्टर दिलीप', 'दर्यासारंग' हे मराठी घरांघरांतून फिरले. तत्कालीन लोकप्रिय कादंबरीकार ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्यांपेक्षा जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांनी बाबूराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्या चोरून वाचल्या. बाबूरावांच्या कथांना पाश्चात्त्य कथांचा आधार असायचा, पण मराठीत लिहिताना महाराष्ट्रीय वातावरणाचा साज असायचा.

आचार्य अत्रे शाळेतील मुलांना शिकवत असत त्यावेळीचा एक किस्सा सांगितला जातो. अत्रे लहान मुलांना विचारतात गीतारहस्य कोणी लिहिले? तेव्हा लहान मुले म्हणत असत, बाबुराव अर्नाळकर. रहस्यकथा आणि बाबुराव अर्नाळकर हे जुन्या काळाच समीकरण होतं. बाबुराव अर्नाळकरांनी सुमारे १४७० च्या वरती रहस्यकथा लिहल्या. प्रत्येक कथा म्हणजे एक कादंबरी. ज्ञान असणाऱ्या पुस्तकांची संख्या १४७०. वास्तविक ही संख्या १८०० च्या वरती असल्याचं सांगण्यात येतं. बाबुराव अर्नाळकर या मराठी लेखकाचा स्वत: चा असा फॅन क्लब होता. त्यांचे फॅनमधल्याच एक वाचक म्हणजे विभाकर कर्वे. विभाकर कर्वे हे कल्याणचे. बाबुराव अर्नाळकरांच्या अनेक रहस्यकथा त्यांना तोंडपाठ होत्या. त्यांची बरीच पुस्तके त्यांच्या संग्रही होती. या व्यक्तीने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डशी संपर्क साधला. गिनीजवाल्यांनी बाबुराव अर्नाळकरांच्या पुस्तकांची




नोंद आपल्या रेकॉर्डमध्ये केली. जगभरात सर्वाधिक पुस्तके लिहण्याचा मान बाबुराव अर्नाळकर यांच्या नावावर जमा झाला. पण बाबुराव अर्नाळकर यांना मात्र त्याच काहीही कौतुक नव्हतं. ते आपले लिहीत राहिली. अगदी वयाच्या शेवटच्या काळात त्यांची दृष्टी अंधुक झाली, दिसेनासे झाले तरिही ते लिहीत होते. बाबुराव अर्नाळकरांचे नाव हे देखील एक रहस्यच होतं. त्यांचं मुळ आडनाव चव्हाण. ते बाबु या नावाने प्रसिद्ध होते. पण लिखाण करु लागल्यानंतर अर्नाळ्याचे म्हणून अर्नाळकर हे नाव लावले. सुरवातीच्या काळात म्हणजे ब्रिटीश सरकारच्या काळात ते रिक्रुटमेंट अधिकारी होते. दूसऱ्या महायुद्धानंतर त्यांना चष्म्याचे दूकान काढून व्यवसाय सुरू केला. गांधी-नेहरूंच्या प्रभावातून त्यांनी स्वातंत्र्ययुद्धात सहभाग घेतला. बाबुराव अर्नाळकर नेमके कधीपासून लिखाण करु लागले तर याबद्दल माहिती मिळते की, ती म्हणजे गिरगावातील लेखक व अभिनेते बबन प्रभू यांच्या वडिलांची प्रिंटिंग प्रेस होती. बाबुराव अर्नाळकर यांचे ते मित्र होते. प्रेसमध्ये काम कमी असल्याने त्यांनी बाबुरावांना एखादे पुस्तक लिहण्यास सांगितले. बाबुरावांनी एक रहस्यकथा लिहली आणि त्यांना छापण्यास दिली. प्रभू यांनी त्यांच्या १ हजार प्रती छापल्या. काही दिवसातच त्या प्रती हातोहात खपल्या. पुढच्या चार महिन्यात एकूण पाच एक हजार पुस्तकांची विक्री झाली. इतक्या कमी काळात इतक्या पुस्तकांची विक्री हा आज देखील विक्रम गणला जातो. त्या काळात वाचणारी लोकं कमी होती तरिही इतक्या मोठ्या संख्येत झालेली विक्री हा खरतर खूप मोठ्ठा विक्रम होता.

आपल्या चाळीश वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी एक हजार चारशे सत्तर हून अधिक पुस्तके लिहली. ही पुस्तके म्हणजे प्रामुख्याने रहस्यकथा असायच्या. झुंझारराव, धनंजय, काळा पहाड अशी काल्पनिक पात्र त्यात रंगवलेली असायची. मराठी साहित्याने बाबुरावांची पुस्तके वाचणारी एक पिढी जन्माला घातली. लहान मुलांच्यात या रहस्यकथा अधिक फेमस होत्या. काल्पनिक, गुढ, गुन्हेगारी मनाचा ठाव घेणारी ही पुस्तके असत. साधारण सत्तर ते ऐंशी पानाच्या या पुस्तकांमध्ये एकच रहस्यकथा असायची. त्यांच्या साहित्याबद्दल तत्कालीन साहित्यांची कोणती किंमत दिली तर वि. स. खांडेकर अशा साहित्याला साहित्य मानण्यास विरोध करायचे. याउलट आचार्य अत्रे यांच्या मते बाबुराव अर्नाळकर यांच्यासारख्या व्यक्तीस साहित्य संमेलनाचे अध्यक्ष करावे इतके त्यांचे साहित्य मोठ्ठे आहे. आपल्या साहित्यप्रेमाबद्दल प्रसिद्ध असणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी तर बाबुराव अर्नाळकर यांच्यासाठी पनवेल येथे पंधरा एकर जमीन देवू केली होती.

***• गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्यानंतर तत्कालीन ब्रिटीश सरकारने त्यांना कुलाब्यामध्ये घर देण्याची सोय केली होती. बाबुरावांनी मात्र यातील कोणत्याही गोष्टीबद्दल मोह दाखवला नाही. त्यांच्या डोक्यात फक्त निःस्वार्थीपणे लिखाण करणं इतकच होतं. त्यामुळे कोणतीही ऑफर न स्वीकारता ते काम करत राहिले. आपले पुस्तक वाचकांच्या हाती पडणं आणि त्यांनी ते वाचणं याहून दूसरं कोणतच सुख त्यांना नको असायचं.***

बाबुरावांचा कार्यकाळ हा १९५० ते ७० समजला जातो. या काळात रहस्यकथांचे ते एकमेव बादशहा होते. नंतरच्या काळात खाडिलकर आणि कंपनीच्या रहस्यकथा आल्या. पुढील काळात म्हणजे ७१ नंतरच्या काळात नारायण धारप, सुहास शिरवळकर यांच्या कथा गाजू लागल्या. पुढे खाडिलकरांची लाट ओसरली तरीही अर्नाळकर लिहितच राहिले. पण त्यांचा स्पीड नंतरच्या काळात कमी झाला. अशा या प्रतिभावान रहस्यकथाकाराचे ५ जुलै १९९६ रोजी वार्धक्याने निधन झाले.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# चाणक्य नीतीचा अवलंब करून जीवन समृध्द बनवा : महेश सावंत

## ‘संजीवनी’मध्ये इंटीग्रेटेड बी.टेक.नवगतांचे स्वागत

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

विद्यार्थ्यांनी चाणक्य नीती नुसार बकोध्यानं, काकचेष्टा , श्वाननिद्रा, अल्पाहारी व गृहत्यागी या पंचसुत्रीचा अवलंब केल्यास ते आपल्या ध्येयापर्यंत जावुन त्यांचे जीवन समृध्द होईल. विद्यार्थी दशेतील उर्जा प्रचंड असते, मात्र या उर्जेला योग्य दिशेने वळवा, असा सल्ला कोपरगांवचे तहसिलदार महेश सावंत यांनी दिला.



संजीवनी युनिव्हर्सिटी अंतर्गत स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलाजी मध्ये इ. १० वी नंतर सहा वर्षे अभ्यासक्रमाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरींगला नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या स्वागत समारंभात श्री सावंत प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते. विद्यापीठाचे प्रसिडेंट श्री अमित कोल्हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी आय सोर्स इन्फोसिस्टिम प्रा. लि. च्या कार्पोरेट हेड व ट्रेनर श्रीमती मंजिरी कुलकर्णी, विद्यापीठाचे व्हाईस चांसलर डॉ. ए.जी. ठाकुर, डीन डॉ. कविथा राणी पी., आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी डॉ. ठाकुर व डॉ. कविथा राणी पी. यांनी उपस्थितांचे स्वागत करून कोर्स बध्दल माहिती देत नियमावली सांगीतली तसेच भविष्यातील संधी सांगीतल्या.

श्रीमती कुलकर्णी म्हणाल्या की जीवनात चांगल्या मित्रांचे जाळे निर्माण करावे. अनुभवांच्या चटक्यांनी माणुस मोठा होत असतो, त्यासाठी सकारात्मक रहा. अध्यक्ष स्थानावरून बोलताना अमित कोल्हे म्हणाले की, सुमारे ४२ वर्षांपूर्वी स्व. शंकरराव कोल्हे यांनी ग्रामीण भागातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी संजीवनी संकुलाची स्थापना केली. त्यामुळे आज जगभर संजीवनीचे माजी विद्यार्थी कार्यरत आहेत. संस्थेचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी अंतर्गत विविध संस्था वाटचाल करीत आहेत. प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी पुढील सहा वर्षे चांगला अभ्यास करून सर्व बाबतीत सहभाग नोंदवावा. त्यांची पुढील ६० वर्षे आनंदात जातील. शेवटी रजिस्ट्रार प्रा.अमोल ढाकणे यांनी आभार मानले.

# हनुमान दूध संस्थेस 33 लाखांचा नफा : शहाजी पाटील

**घुणकी : हॅलो प्रभात**

पारगाव (ता.हातकणंगले) येथील हनुमान सहकारी दूध संस्थेला अहवाल सालात ३२ लाख ९४ हजार ४७१ रुपये नफा झाल्यास झाला असल्याची माहिती अध्यक्ष, तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक शहाजीराव पाटील यांनी दिली. पारगाव येथील हनुमान सहकारी दूध संस्थेची ४९ वी वार्षिक सभेत श्री.पाटील बोलत होते.




श्री.पाटील पुढे म्हणाले, दूध उत्पादकांना दिवाळीस २९ लाख ५० हजार २३८ रुपये, सुग्रास रिबेट ६४ हजार ६७० रुपये, नोकर बक्षीस ९५ हजार ८६१ रुपये, दीपावली भेट १ लाख रुपये देणार आहे. जास्तीत जास्त दूध पुरवठा करणाऱ्या गाय व म्हैस दूध उत्पादकांना बक्षीसे, दूध उत्पादक व कुटुंबातील व्यक्ती मयत झाल्यास अनुदान, जनावर दगावलेस आर्थिक सहाय्य, दूध उत्पादकांना मापक दरात दळप कांडप, दूध उत्पादकांसाठी शैक्षणिक सहली, अभ्यास दौरे, हळदीकुंकू समारंभ, दूध उत्पादकांच्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात असे श्री पाटील यांनी सांगितले.

यावेळी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद शिंदे, चार्टड अकाउंट सुनील नागावकर, वारणा दूध संघाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. जे. बी. पाटील यांची भाषणे झाली. यावेळी बाबासाहेब पाटील, माधवराव घाटगे, भगवान बोने, उपाध्यक्ष धनाजी पाटील, राजेंद्र धुमाळ, बाबुराव मोहिते, कृष्णात पाटील, बाळासाहेब पाटील, जगन्नाथ पाटील, शिवाजी सिद, अनघा कुलकर्णी, सुवर्णा पाटील यांच्यासह सभासद उपस्थित होते. संजय कुलकर्णी यांनी स्वागत केले.संचालक सुहास कारंडे यांनी सूत्रसंचालन केले. मुराद मुल्ला यांनी आभार मानले.

# यड्राव बॅंकेकडून शेतकरी, युवा उद्योजकांना आर्थिक पाठबळ : आ. राजेंद्र पाटील-यड्रावकर

## यड्राव बँकेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**कुरुंदवाड : हॅलो प्रभात**

सहकारमहर्षी स्व. शामरावआण्णा पाटील-यड्रावकर यांच्या मार्गदर्शनातून स्थापन झालेल्या यड्राव बँकेने गेल्या आर्थिक वर्षात व्यवसायवृद्धी, शाखा विस्तार आणि डिजिटल बँकिंग सेवेत लक्षणीय प्रगती साधली आहे. शेतकरी, युवा उद्योजक आणि व्यावसायिकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांद्वारे भक्कम आर्थिक पाठबळ देण्यात सातत्य राखले, असल्याचे प्रतिपादन आ.डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी केले. ते जयसिंगपूर येथील द मर्चंट असोसिएशनच्या सभागृहात आयोजित यड्राव बँकेच्या ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.




सभेची सुरुवात व विषयपत्रिका मंजूर सभेच्या प्रारंभी स्व. शामरावआण्णा पाटील यड्रावकर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले.

बँकेचे व्हा. चेअरमन दिलीप मगदूम यांनी स्वागत केले, तर मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीशैल नायकुडे यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.

सभासदांनी सर्व १३ विषयांना एकमताने मंजुरी दिली.बँकेचे चेअरमन अजय पाटील-यड्रावकर यांनी प्रगतीचा आढावा घेताना लवकरच शाखा विस्ताराद्वारे अधिकाधिक नागरिकांना सेवा पुरवली जाणार असल्याचे सांगितले. ठेवीदारांना चांगला व्याज परतावा व कर्जदारांना वाजवी व्याजदर देणारी बँक म्हणून यड्राव बँकेची प्रतिमा बळकट होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जयसिंगपूरचे माजी नगराध्यक्ष संजय पाटील-यड्रावकर यांनी सांगितले की, चालू आर्थिक वर्षात बँकेने २२१ कोटी रुपयांच्या ठेवी आणि ३७५ कोटी रुपयांचा मिश्र व्यवसाय साध्य केला आहे. बँकेचे नवीन प्रशासकीय कार्यालय अंतिम टप्प्यात असून लवकरच स्वमालकीच्या इमारतीत कार्यान्वित होणार आहे.

या सभेस शरद साखर कारखान्याचे संचालक आदित्य पाटील-यड्रावकर, लेखापरीक्षक व्ही. के. बस्तवाडे, संचालक मंडळ सदस्य अनिल बागणे, आशिष मुरचिट्टे, कुमार उपाध्ये, बँकेचे संचालक वैभव कर्वे, प्रशांत अपीने, प्रदीप चौगुले, विशाल आवटी, संजय पाटील, महिला संचालिका सौ. त्रिशला संजय पाटील-यड्रावकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# सहकारमहर्षी स्व. शाममहावीर नागरी पतसंस्थेस १ कोटी ३६ लाखांचा उच्चांकी नफा : अॅड.एन.आर.पाटील

**घुणकी : हॅलो प्रभात**

किणी (ता.हातकणंगले) येथील महावीर नागरी सहकारी पतसंस्थेला अहवाल सालात १ कोटी ३६ लाखांचा उच्चांकी नफा झाला असून सभासदांना १२ टक्के लाभांश देणर असल्याची घोषणा संस्थाध्यक्ष व वारणा दूध संघाचे संचालक अॅड एन. आर. पाटील यांनी केली.



अॅड पाटील म्हणाले, २२ कोटींच्या ठेवी, १४ कोटीं कर्ज, वसुल भागभांडवल १ कोटी ३० लाख, स्वनिधी ७ कोटी ७० लाख, गुंतवणूक १७ कोटी, एन पी ए ०% आहे. संस्थेला नुकतेच कोल्हापूर जिल्हा कार्यक्षेत्र मिळाले. सचिव बाळासाहेब पाटील यांनी अहवाल वाचन केले. विषय पत्रीकेवरील सर्व विषय सभासदांनी एकमताने मंजूर केले. लेखापरिक्षक श्रीकांत चौगुले, अॅड विवेक कमलाकर, लक्ष्मी सरस्वती महिला पत संस्थेच्या उपाध्यक्षा संगिता पाटील, लियाकत शेख यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी किणी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झालेबद्दल अॅड. पाटील यांचा, वारणा दूध संघातून सेवा निवृतीबद्दल भिमराव खांडेकर, शासकीय तंत्रनिकेतनमध्ये निदेशक तथा प्रशिक्षकपदी निवड झालेबद्दल अभिजीत कुंभार, महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभागामध्ये निवड झालेबद्दल वृषभ पाटील, महसुल सहाय्यकपदी निवडीबद्दल उदय ठाकुर, कराड अर्बन बँक येथे सहायक कनिष्ठ अधिकारीपदी निवड झालेबद्दल जय यादव, पोलीस दलात निवडीबद्दल अक्षय समुद्रे, प्रतिक पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वारणाचे संचालक अनिल पाटील, विजय धनवडे, शांतिनाथ पाटील, गुंडु दणाणे, तुकाराम चव्हाण, अजित पाटील, संस्थेचे सर्व संचालक, सल्लागार व सभासद उपस्थित होते.

श्रद्धांजली ठरावाचे वाचन संचालक प्रविण खोपकर यांनी केले. उपाध्यक्ष सुनिल कदम यांनी आभार मानले.

# ‘आर्या ओम्निटॉक’तर्फे ‘हॅलो स्मार्ट सेन्सर्स’ सादर

**मुंबई : हॅलो प्रभात**

आर्या ओम्निटॉक या भारतामध्ये एक विश्वसनीय संवाद व सुरक्षा उपाययोजनांची सेवा देणाऱ्या कंपनीने ‘मोटोरोला’चे ‘हॅलो स्मार्ट सेन्सर्स’ देशभरात नुकतेच सादर केले. हॅलो स्मार्ट सेन्सर्स हे प्रगत इंटरनेट ऑफ थिंग्जवर आधारलेले (आयओटी), गैर हस्तक्षेप न करणारे, स्मार्ट निरीक्षण प्रणालीचे एक सोल्युशन आहे. या सादरीकरणामुळे आर्या ओम्निटॉक ही हॅलो स्मार्ट सेन्सर्सची भारतातील प्रमुख वितरक बनली आहे. विविध उद्योग क्षेत्रांमध्ये गोपनीयतेला धक्का न लावता सुरक्षा उपाय राबवले जाण्याचा नवा मार्ग आता यामुळे मोकळा झाला आहे.



पारंपरिक प्रणालींपेक्षा वेगळे असणारे हॅलो स्मार्ट सेन्सर गोपनीयतेशी तडजोड न करता अचूक सुरक्षा प्रदान करण्याकरीता डिझाइन करण्यात आले आहेत. या सेन्सर्समधील अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे ऑडिओ वा व्हिडिओ रेकॉर्डिंग न करता संपूर्ण शोध घेता येतो आणि रिअल-टाइम संकेत मिळू शकतात. त्यामुळे हे सेन्सर्स शाळांमधील स्वच्छतागृहे, रुग्णालयांचे वॉर्ड, वसतिगृहे, हॉटेलमधील रूम्स आणि उत्पादन विभाग यांसारख्या ठिकाणी अत्यंत उपयुक्त ठरतात.

# कागल तालुका शैक्षणिक क्षेत्रात अव्वल करूया गटशिक्षणाधिकारी सौ.कासोटे यांचे आवाहन

**कागल : गोरख कांबळे.**

कागल तालुक्यातील व्हन्नूर येथील दौलतराव निकम माध्यमिक विद्यालयात प्राथमिक व माध्यमिक मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेत त्या बोलत होत्या.




गटशिक्षणाधिकारी सौ. कासोटे यांनी तंबाखूमुक्त आरोग्यसंपन्न शाळा,वार्षिक नियोजन,पोषण आहार,विद्यार्थी प्रवेश, नवभारत साक्षरता अभियान, विद्यार्थी गणवेश, शाळा पूर्वतयारी,पालक भेटी याबाबत विस्ताराने मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा निबंधक शशिकांत कदम, शाळा तंबाखूमुक्त बाबत सविता पाटील, सुधीर बंडगर यांची मनोगते झाली. यावेळी विस्तार अधिकारी रामचंद्र गावडे, केंद्रप्रमुख एस.व्ही. पाटील, सुनिता किनेकर,संजय कुर्डूकर सी.आर.चौगुले, विजया देशमुख, एकनाथ अजघेकर,सुनील पाटील, श्री. निंबाळकर, जी.एस. पाटील, अशोक बुगडे,सदानंद पाटील, एस.के.पाटील हे प्रमुख उपस्थित होते. त्याचबरोबर प्राथमिक व माध्यमिकचे १८५ हुन अधिक मुख्याध्यापक उपस्थित होते. याचवेळी शैक्षणिक कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांकात राज्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी सारिका कासोटे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यशाळेचे स्वागत मुख्याध्यापक व्ही.जी.पोवार, प्रास्ताविक केंद्रप्रमुख एस.व्ही. पाटील, सूत्रसंचालन एम.जे. खोत तर आभार अशोक बुगडे यांनी मानले.

# ‘मेड इन इंडिया’ सर्जिकल रोबोट यात्रेचा भारत दौरा सुरू

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील पहिली आणि एकमेव स्वदेशी विकसित सर्जिकल रोबोटिक प्रणाली असलेल्या एसएसआय मंत्राच्या उत्पादक एसएस इनोव्हेशन्सने आज गुरुग्राम येथील त्यांच्या मुख्यालयातून एसएसआय मंत्रा एम 'मेड इन इंडिया' सर्जिकल रोबोट यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. या रोड शोचे उद्घाटन हरियाणा सरकारचे उद्योग आणि वाणिज्य मंत्री श्री राव नरबीर सिंह यांनी केले. एसएसआय मंत्रा एम सर्जिकल रोबोट यात्रेसह भारताने आरोग्यसेवेत एका परिवर्तनकारी प्रवासाला सुरुवात केली आहे. याअंतर्गत पहिल्या मोबाईल रोबोटिक सर्जरी प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक युनिटचे अनावरण देखील करण्यात आले. या अत्याधुनिक 'टेलीसर्जरी-ऑन-व्हील्स' उपक्रमामुळे देशभरातील रुग्णालये आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांना प्रगत शस्त्रक्रिया तंत्रज्ञान आणि कौशल्य निर्मितीच्या संधी थेट उपलब्ध होतील. राजस्थानमधील प्रवासातील पहिल्या टप्प्यात १५०० किमीच्या अंतरात ५०० हून अधिक डॉक्टरांना प्रशिक्षण आणि शिकण्याच्या संधी प्रदान केल्या जातील. राजस्थानमधील पहिल्या टप्प्यात एसएसआय मंत्रा एमचा प्रवास ३ आणि ४ जुलै रोजी जयपूर येथील एसएमएस मेडिकल कॉलेज येथून सुरू होईल. येथे वैद्यकीय समुदायासाठी थेट प्रात्यक्षिके आणि परस्परसंवादी प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातील. मंत्रा एम ४ जुलै रोजी दुपारी एम्स जोधपूरला पोहोचेल. या यात्रेत ६ जुलैपर्यंत रफकॉनमध्ये सहभागी होणार आहे. ६ जुलै रोजी संध्याकाळी ते मथुरा दास माथुर मेडिकल कॉलेजला रवाना होईल आणि ७ जुलै रोजी येथे विविध सत्रे होतील.



# स्कोडा ऑटोडरे ५ लाख कारची निर्मिती उत्पादन क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत केले

**मुंबई : हॅलो प्रभात**

स्कोडा ऑटोने भारतातील अत्याधुनिक उत्पादन सुविधाअंतर्गत ५ लाख कारची निर्मिती करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. स्कोडा ऑटो फोक्सवॅगन ग्रुप (एसएव्हीडब्ल्यूआयपीएल)चे भाराताप्रती असलेले वचनबद्धतेचे दर्शन या यशातून होते. भारतीयांची कारागिरी आणि स्थानिकीकरणावरील त्यांचा विश्वासही यातून दिसून येतो. या व्यवहारात जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि सुरक्षेवर भर देण्यात आला आहे.




२००१ मध्ये स्कोडाने छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) येथील त्यांच्या प्रकल्पातून पहिली ऑक्टेव्हिया बाजारात आणली. तेव्हापासून या ब्रँडचा भारतातील विस्तार वाढत गेला. तसेच त्यांच्या उत्पादनातही विविधता आली. ऑक्टेव्हिया, लॉरा, सुपर्ब आणि कोडियाकसारख्या प्रतिष्ठित गाड्यांपासून ते कुशाक, स्लाव्हिया आणि पहिली सब-४-मीटर किलाक यासारख्या नव्या जमान्यातील लोकप्रिय गाड्यांपर्यंत ही प्रगती आहे.

# मुळा धरण जून मध्ये भरण्याचा विक्रम हुकला

**राहुरी :हॅलो प्रभात**

१९७२ मध्ये स्थापन झालेल्या व नगर जिल्ह्याची जलसंजीवनी ठरलेला मुळा धरणाचा दरवर्षी काही ना काही विक्रम होत असतात. तसा विक्रम करण्याची संधी यंदाच्या वर्षी हुकली आहे.

गेल्या ३०वर्षात जून महिन्यामध्ये मुळा धरण निम्मे ५०% क्वचितच भरलेले आहे . या वर्षी जूनच्या अंतिम सप्ताह पर्यंत धरणात ४५ ते ४८% अधिक साठा झाला होता . मात्र पावसाने हुलकावणी दिल्याने व जून अखेर पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने यंदाच्या वर्षी जूनमध्ये मुळा धरण निम्मे भरण्याचा विक्रम हुकला ३० जून ला कमीत कमी १ जुलै २०२५ रोजी मुळा धरण साठा ५०% टक्क्यांचा टप्पा पार करेल असे वाटले होते. पण मुळा धरण भरण्यास २जुलै ला धरणाचा साठा १३२७४ ालर्षी वर पोहचला व धरण ५०% झाले.



गेल्या पंचवीस ते तीस वर्षांच्या काळात मुळा धरण १३ वेळा जुलै महिन्यात निम्मे भरलेले आहे तर ऑगस्ट महिन्यामध्ये धरणसाठा ५०टक्क्यांपर्यंत पोहोचायला ऑगस्ट महिना उजाडलेला आहे.यंदा जून महिन्यातच निम्मे भरण्याचा विक्रम हुकल्याने मुळा धरण मंगळवारी २ जुलैला निम्मे भरले.यापूर्वी २००६ , २००७ ,२००८ ला अनेक विक्रमांनी गाजलेले आहे . धरणातून मुळा नदीपात्रात जायकवाडी कडे तब्बल ४४ हजार क्युसेकने पाणी सोडण्याचा विक्रम तर पाणलोट क्षेत्रातून तब्बल ५५ ते ६० हजार पाण्याची आवक होत असल्याचा विक्रम झालेला आहे .२००४ या वर्षी मुळा धरणात नीचांकी ४हजार २५० दशलक्ष घनफूट पाणीसाठ्याचाही विक्रम सर्वश्रुत आहे . नगर जिल्ह्याची जलसंजीवनी समजल्या जाणाऱ्या मुळा धरणाच्या सध्याच्या पाणी पातळीकडे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे .या वर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची दाट शक्यता असल्याचे बोलले जाते. आजअखेर धरणात १३२६५ दलघफुपाण्याचा साठा असून कोतुळ येथील पाण्याची आवक ५६३८ क्यूसेसने सुरु असून ह्या कोतुळ येथील पाण्याची आवक कमी जास्त होत आहे. मुळा धरणाच्या परिस्थितीवर मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील उपभियंता विलास पाटील व शाखा अभियंता आर जे पारखे व त्यांचे सहकारी लक्ष देऊन आहेत.

दैनिक
# हॅलो प्रभात
■ सांगली ■ कोल्हापूर ■ शनिवार, ०५ जुलै २०२५






## जीएसटी आजच्या अर्थव्यवस्थेचा कणा : किशोर लुल्ला

### वसंतरावदादा महाविद्यालयात वाणिज्य मंडळ उद्‌घाटन

**तासगाव : हॅलो प्रभात**

टॅक्सेशन मध्ये करियर करण्यासाठी बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांना मोठ्या संधी आहेत. जीएसटी कायदा समजून घ्या. जीएसटी आजच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे उद्गार 'लुल्ला चॅरिटेबल ट्रस्टचे' संस्थापक किशोर लुल्ला यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे वाणिज्य मंडळ उद्घाटन प्रसंगी बोलताना काढले. ते पुढे म्हणाले जीवनावश्यक वस्तूंना टॅक्स लागत नाही.जीएसटी सहा प्रकारे आकारली जाते हे सांगून जीएसटी कायद्याचा अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.



शून्य टक्के, तीन टक्के, पाच टक्के, बारा टक्के, अठरा टक्के , अठ्ठावीस टक्के जीएसटी कोणकोणत्या उत्पादनावर लावला जातो हे सोदाहरण सांगितले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी स्किल ओरिएंटेड कार्यक्रम घेणे हाच नवीन शैक्षणिक धोरणाचा उद्देश असल्याचे सांगून ज्ञान, विज्ञानाबरोबरच सुसंस्कारी विद्यार्थी घडविणे हाच आमचा ध्यास असल्याचे सांगितले. वाणिज्य विभाग वर्षभर राबवित असलेल्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमाबद्दल त्यांचे कौतुक केले व कॉमर्स असोसिएशनच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या वर्षभरातील सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.अमोल सोनवले यांनी केले.पाहुण्यांचा परिचय डॉ.श्रुती परचुरे यांनी केला तर आभार प्रा.जी.आर.पाटील यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य जे.ए. यादव, प्रा.नेहा मोरे, ॲड.निलेश कुंभार, प्रा.एस. एच.यमगर, प्रा.एस.एस.पाणारी, डॉ.अर्जुन वाघ, प्रा.रमेश मोटे, डॉ.सुनिल गावीत, प्रा.रामा रोकडे, डॉ.अमित माळी यांसह वाणिज्य विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.राहुल कुल यांनी जन आरोग्य योजना संदर्भात वेधले

**दौंड : हॅलो प्रभात**

महात्मा ज्योतिराव फुले जन योजनेतून गोर गरीब जनतेला दर्जेदार, मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार मिळावेत यासाठी चालू पावसाळी अधिवेशनात आमदार राहुल कुल यांनी याबाबत लक्षवेधी सूचना चर्चेद्वरे सभागृहात मांडल्या.



यासंदर्भात, धर्मादाय रुग्णालयांना योजना बंधनकारक करावी, उपचारांचे दर वाढवावेत, औषधांचा समावेश या योजनेत करण्यात यावा आणि रुग्णांना मदत न करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करावी व रुग्ण सेवक व सोशल वर्कर त्वरित मदत देण्यासाठी आदेश द्यावेत अशा अनेक महत्वपूर्ण योजनेकरीता आ. कुल यांनी लक्ष वेधले. गोर गरीब जनतेला दर्जेदार व मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार मिळावेत, हा माझा मुख्य उद्देश आहे. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्यातील सर्व धर्मादाय म्हणजेच चॅरिटेबल रुग्णालयांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना बंधनकारक करण्यात आली असल्याचे सकारात्मक आश्वासन मिळाले असून आपण या संदर्भात सातत्याने रुग्ण तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे नमूद केले.

## वारणावती वसाहतीत अजगरांचं साम्राज्य



**शिराळा : नारायण घोडे पाटील**

चांदोली परिसरातील वारणावती वसाहत वन्य प्राण्यांचं आश्रयस्थान बनू लागली आहे. वारणा प्रकल्प कर्मचाऱ्यांच्या साठी बांधलेली ही वसाहत सध्या अखेरची घटका मोजू लागली आहे. जीर्ण अवस्थेत झालेल्या मोकळ्या आणि पडक्या खोल्या. अवतीभवती वाढलेलं झाडाझुडपांचं साम्राज्य यामुळे गवे, बिबटे यांचे येथे वारंवार दर्शन होत आहे. यातच आता अजगराची भर पडली आहे. गेल्या वर्षभरापासून वारंवार या वसाहतीत अजगराचं दर्शन होऊ लागला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

मणदूर मुक्कामी येणाऱ्या शिराळा मणदूर या बस समोरच परवा रात्री सव्वा नऊच्या सुमारास वारणावती येथे भला मोठा अजगर आला. चालकाने तात्काळ बस थांबून त्याचे चित्रीकरण केलं.संथ गतीने तो वारणा प्रकल्प कार्यालय परिसरातील झाडाझुडपात लिहून गेला.

गेल्या पंधरा दिवसांपूर्वी वसाहती मधील करमणूक केंद्राजवळ रात्री सव्वा आठच्या अनेक युवकांना त्याच दर्शन झालं.काही महिन्यांपूर्वी मणदूर येथील हुतात्मा स्मारक परिसराच्या पाठीमागे असणाऱ्या उसाच्या शेतात दहा फूट लांबीचा भला मोठा अजगर सर्पमित्रांनी पकडून सुरक्षित स्थळी सोडला. याच दरम्यान वारणावती वसाहती मधील मध्यवर्ती ठिकाणी रात्री नऊच्या सुमारास बारा फूट लांबीचा ६० ते ७० किलो वजनाचा अजगर झाडावर युवकांना दिसला. सर्पमित्रांच्या मदतीने त्याला पकडून वन्यजीव कर्मचाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आला.

## प्रकाश गडळे यांच्या कडून वारकऱ्यांना रेनकोट वाटप



**कडेगाव : हॅलो प्रभात**

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे पायी दिंडीत चालणाऱ्या वारकऱ्यांना व संत बाळूमामा यांच्या बघा क्रमांक ७ मधील मेंढपाळ सेवकांना भाजपाचे सांगली जिल्हा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश गडळे व अमरापूरच्या लोकनियुक्त सरपंच सुनिता गडळे यांच्या कडून पावसाळी रेनकोटचे वाटप करण्यात आले.

यावेळी विलास मोरे, माजी सरपंच रेखा मोरे, मोहन मोरे, वसंत जाधव, कुमार शिंदे, धनाजी पवार, यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## तानाजी चवरे यांची यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी निवड



**शिराळा : हॅलो प्रभात**

साळशिरंबे (ता.कराड) येथील सुप्रसिद्ध कुस्ती संघटक तानाजी चवरे यांची यशवंतराव चव्हाण फाउंडेशन, मुंबई तर्फे देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२४-२५' साठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्काराची घोषणा फाउंडेशनचे अध्यक्ष संजय रत्नाबाई किसन सावंत यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वरे केली.या पुरस्काराचे वितरण १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजता घणसोली, नवी मुंबई येथे होणाऱ्या विशेष कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

तानाजी चवरे यांनी गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने कुस्ती क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कुस्ती चळवळ त्यांनी नव्या उंचीवर नेली. त्यांनी नवीन दांव-पेच रुजवत कुस्तीच्या प्रशिक्षण व आयोजनात उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्य दाखवले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या गौरवप्राप्तीनंतर आमदार डॉ.अतुल भोसले, कुस्तीप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी तानाजी चवरे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## शिराळकरांना जिवंत नागाची पूजा करण्याची संधी मिळावी

### प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांची विधानसभेत मागणी

**शिराळा : हॅलो प्रभात**

शिराळकरांना पुन्हा जिवंत नागाची पूजा करण्याची संधी मिळावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सुचनेद्वरे केली.



सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात नागपंचमीला आगळेवेगळे महत्त्व आहे. या भागात पूर्वी जिवंत सापांची पुजा केली जायची पण सन २००२ पासून न्यायालयाची बंधन आली. त्यामुळे ही बंधने उठवण्यात यावी असे ते म्हणाले. नागपंचमी सणाला जिवंत नागाची विधीवत पूजा करताना त्यांना कुठल्याही प्रकारची इजा होऊ नये आणि त्यांच्या जिवीतास धोका निर्माण होऊ नये याची खबरदारी शिराळकरांकडून घेण्यात येते तसेच, पूजा झाल्यानंतर त्यांना सुखरूपपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येते. त्यामुळे शिराळकरांना पुन्हा जिवंत नागाची पूजा करण्याची संधी मिळावी, यासाठी राज्याचे वनमंत्री प्रयत्न करतील का? असा प्रश्न त्यांनी सभागृहात उपस्थित केला.

## एस.एस.जी.एम महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज कोपरगाव महाविद्यालयातील करिअर कौन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेल, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक सायन्स, संगणक विज्ञान विभाग, आय.क्यू.ए.सी. व डायरेक्टोरेट ऑफ फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज मुंबई या विभागाच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह चे आयोजन केलेले होते.



सदर मुलाखतीसाठी डायरेक्टोरेट ऑफ फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज मुंबई यांच्या वतीने सी. एम. एस. कॉम्प्युटर्स तर्फे योगेश बिरमोळे, जितेंद्र शिंत्रे आणि अतुल कुमार या तज्ञांची समिती आली होती. या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये एकूण १३४विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

सदर उपक्रमाचे प्रास्ताविक विज्ञानशाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत यांनी केले. तर करियर कौन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.दिलीप भोये यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.अरुण देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

## बापूसाहेब येसूगडे संग्राम पतसंस्थेस कार्यक्षेत्र वाढीस मान्यता

**कुंडल : हॅलो प्रभात**

स्व.बापूसाहेब येसूगडे यांनी स्थापन केलेल्या व श्रीमती.ज्योस्ना येसूगडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली वाटचाल करीत असलेल्या बापूसाहेब संग्राम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेला कोल्हापूर विभागीय (सांगली जिल्हा, कोल्हापूर जिल्हा व सातारा जिल्हा) कार्यक्षेत्र वाढीस सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य पुणे यांची परवानगी मिळालेली आहे.

संस्थेची स्थापना दिनांक ३०/१० १९९८ साली झाली असून संस्थे सुरुवातीपासून ऑडिट वर्ग 'अ 'आहे.संस्था अखंडीतपणे गेली २६ वर्ष सभासदांना ११ टक्के लाभांश देत आहे.जून २०२५ अखेर संस्थेकडे भाग भांडवल एक कोटी २५ लाख ठेवी रु. १२० कोटी, कर्ज रू.८५ कोटी, बँकेतील गुंतवणूक रु. ३७ कोटी सुनिधी नऊ कोटी व एकूण व्यवसाय २१० कोटी इतका आहे. सध्या संस्थेच्या १८ शाखा कार्यरत असून सर्व शाखा नफ्यात आहेत. संस्थेने सभासदांचा व ठेवीदाराचा विश्वास संपादन करून प्रगतीची वाढती कमान चालू ठेवली आहे. संस्थेचा पारदर्शक कारभार व सहकार खात्याचे जिल्हा कार्यक्षेत्र वाढीचे सुधारित सर्व निकष पूर्ण केल्यामुळे संस्थेस कोल्हापूर विभागीय कार्यक्षेत्र वाढीस नुकतीच सहकार खात्याची मंजुरी मिळालेली आहे अशी माहिती संस्थेचे चेअरमन निलेशभैय्या येसूगडे यांनी दिली. ते पुढे म्हणाले की संग्राम पतसंस्था स्थापने पासून प्रगतीच्या बाबतीत चढती कमान असून याचे श्रेय संस्थेचे सभासद, ठेवीदार संचालक मंडळ व संस्थेचा सेवक वर्ग यांना दिले जाते.

संस्था चालू आर्थिक वर्ष रु. ३०० कोटीचा व्यवसाय पूर्ण करेल असा विश्वास व्यक्त केला.

## ऐश्वर्या पाटील ची स्पर्धा परीक्षेमधून A. E. Class -2 पदी निवड

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

नंदकुमार पाटील व सौ वैशाली पाटील यांची कन्या कु.ऐश्वर्या नंदकुमार पाटील हिची महापारेषण झोन ऑफिस कराड येथे स्पर्धा परीक्षेमधून. **A. E. Class -2** पदी निवड झाल्याबद्दल शिक्षक संघ वाळवा परिवाराकडून अभिनंदन शुभेच्छा व सत्कार सोहळा संपन्न झाला.



सुधाकर पाटील कार्याध्यक्ष केंद्रप्रमुख संघटना महाराष्ट्र राज्य, तानाजी खोत पुणे विभागीय अध्यक्ष, माणिकराव पाटील ज्येष्ठ मार्गदर्शक, शिवाजी चव्हाण, माजी अध्यक्ष संजय काटे, वसंतराव शिंगारे संचालक शिक्षक पतसंस्था शिक्षक नेते कुमार बल्लाळउत्तमराव पाटील, भगवान साठे माजी, केंद्रप्रमुख अर्जुन कदम, विश्वनाथ जोशी, धनाजी पाटील, मोहन सुतार, दादासाहेब खोत, शंकर साठे प्रकाश पाटील, दिलीप खोत, शिवाजी साळुंखे, विश्वास जानकर, राजाराम तिवले तसेच नवोदय विद्यालयासाठी निवड झालेली सान्हवी घाडगे, महेश घाडगे व सौ.घाडगे उपस्थित होतें.

## श्री शिवाजी हायस्कूलमध्ये कृषीदिन उत्साहात



**चिंचणी : हॅलो प्रभात**

कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूल च्या परिसरात कृष्णा कृषी महाविद्यालयाच्या कृषीदुतांनी कृषीदिन वृक्षारोपण करुन उत्साहात साजरा केला.

यावेळी मुख्याध्यापक अरुण सांवत, पर्यवेक्षक सतिश मेटकरी, उमाकांत सांवत, कृषीदूत निखिल गावडे, सत्यजीत मेटकर, अभय मदवाने, विवेक कदम, सौरभ कदम, श्रेयश मोरे तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## बबनराव शिंदे यांच्यावर होणारी शस्त्रक्रिया यशस्वी होवो

### वारकऱ्यांना मोफत चहा

**टेंभुर्णी : हॅलो प्रभात**

माढा तालुक्याचे मा.आ.बबनदादा शिंदे हे सध्या अमेरिकेमध्ये असून त्यांच्यावर होणारी हृदयाची शस्त्रक्रिया यशस्वी होवो यासाठी टेंभुर्णी मध्ये विविध ठिकाणी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकरी भाविक भक्तांना मोफत चहा, अल्पोपहार, केळी, लाडू, चिवडा यासारखे अनेक खाद्यपदार्थाचे वाटप करण्यात येत आहे. आषाढी एकादशीचे औचित्य साधत असंच कुर्डूवाडी बायपास लगत असलेले श्री हॉटेलचे मालक अंकुश कुटे व शिवशंकर हॉटेलचे मालक बाळासाहेब चव्हाण यांनी दादांना दीर्घ आयुष्य लाभो व त्यांच्यावर होणारी शस्त्रक्रिया यशस्वी होवो यासाठी बुधवार व गुरुवार या दोन दिवशी वारकऱ्यांना मोफत चहा बिस्कीट वाटप केले.



व सर्व वारकऱ्यांसोबत मा आ बबनदादा शिंदे यांना दीर्घायुष्य लाभो यासाठी विठ्ठल-रुक्मिणींना साखडे घालण्यात आले. यावेळी खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडूनाना ढवळे उपस्थित होते.

हनुमंत चव्हाण, अँड सचिन चव्हाण, नवनाथ शिंदे, सुनील भोसले, पत्रकार संतोष वाघमारे, सोमनाथ नलवडे, सुरज काजी, नागनाथ गायकवाड यांनीही या उपक्रमास हजेरी लावत वारकऱ्यांना चहा वाटप करण्यास सहकार्य केले.




# संमिश्र


## आरव साळोखेचा राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत चॅम्पियन म्हणून गौरव



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गोवा येथे झालेल्या १० व्या नॅशनल लेव्हल अबॅकस चॅम्पियनशिप २०२५ मध्ये लिटल हार्ट इंग्लिश मीडियम स्कूल, पाचगाव येथील विद्यार्थी कु. आरव अर्जुन साळोखे याने राष्ट्रीय चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकावला.याबद्दल माजी लोकायुक्त सरपंच संग्राम पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी ऋषिकेश पाटील, पंकज शिरगावे, अनघा जोशी व अर्जुन साळोखे यांनी आरवचा सत्कार करून त्याचे अभिनंदन केले. हा गौरव पाचगावसह कोल्हापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

## स्कोडा इंडियाने गाठला सर्वोच्च सहामाही विक्रीचा टप्पा



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

स्कोडा ऑटो इंडिया प्रगतीच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करत आहे, जेथे भारतात २५ वा वर्धापन दिन आणि जागतिक स्तरावर १३० वे वर्ष साजरा करत आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटोने भारतातील आपल्या २५ वर्षांच्या इतिहासामध्ये सर्वोच्च सहामाही विक्री संपादित केली आहे.'स्कोडा'चे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, आमच्या महत्त्वपूर्ण सहामाही विक्रीमधून भारतातील ग्राहकांनी स्कोडा उत्पादने व सर्विसेसचा केलेला अवलंब दिसून येतो. आमच्या ग्राहकांना दररोज विश्वातील सर्वोत्तम स्थळांना एक्स्प्लोअर करायला आवडते. आमच्या पोर्टफोलिओमध्ये कायलॅकची भर करण्यासह आम्ही आता 'एसयूव्ही फॉर एव्हरीवन'च्या माध्यमातून, तसेच आमच्या सेदान ऑफरिंगच्या माध्यमातून त्यांचा प्रवास अधिक सुखकर व उत्साहवर्धक करत आहोत.२०२५ च्या पहिल्या सहामाहीत ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटो इंडिया आता भारतातील टॉप सात ऑटोमोटिव्ह ब्रँड्समध्ये सामील झाली आहे. २०२४ मधील रँकिंग्जच्या तुलनेत कंपनीने चार पोझिशन्स वर झेप घेतली आहे. तसेच, स्कोडा ऑटो इंडियाने २०२२ मधील २८,८९९ युनिट्सच्या सर्वोत्तम सहामाही विक्रीला मागे टाकले आहे.

## सर्जेराव सागावकर यांचं समाजहितासाठी कार्य : सत्यजित पाटील



**कोतोली : हॅलो प्रभात**

सर्जेराव सागावकर यांचं समाजहितासाठी कार्य आहे, त्यांनी परखंदळे येथे समाजाभिमुख काम केले आहे.

कोतोली पैकी माळवाडी (ता. पन्हाळा) येथील शिवतेज शिक्षण संस्था संचलित श्री रामचंद्र पवार हायस्कूल, परखंदळे येथील लिपिक सर्जेराव सागावकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव समारंभ संपन्न झाला.यावेळी माजी आमदार सत्यजित पाटील बोलत होते.या प्रसंगी शिक्षक नेते दादासाहेब लाड, शिवतेज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्याम पवार, माजी आमदार सत्यजित पाटील, महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे कार्याध्यक्ष बाबासो पाटील, तसेच मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष राहुल पवार यांच्या शुभहस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक बाबासाहेब चौगले होते. यावेळी बोलताना माजी आमदार सत्यजित पाटील यांनी सांगितले, सेवानिवृत्तीनंतरचे जीवन समाजसेवेस अर्पण केल्यास खरे आत्मिक समाधान लाभते.


दादा लाड म्हणाले, सर्जेराव सागावकर यांनी लिपिक पदाची जबाबदारी नेटाने पार पाडत शिक्षण संस्थेच्या उभारणीत सचिव म्हणून मोलाचे योगदान दिले आहे.कार्यक्रमास उत्तम पाटील, मनोहर पाटील, राजाराम शिंदे, प्रकाश कोकाटे, जीवन पाटील, तानाजी चौगुले, पी.एम.पाटील, आर.बी.पाटील, एस.डी.पाटील, अण्णासाहेब गायकवाड, सागर पाटील, पांडुरंग सागावकर, आर. टी. सागावकर, नामदेव खोत, सचिन गायकवाड, जयकुमार पाटील यांच्यासह शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आरआयटीमध्ये एआय मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

येथील राजारामबापू इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि आईई आरआयटी चॅटर यांच्या संयुक्त विद्यमाने. २३ जून २०२५ रोजी 'एआय मार्गदर्शन आणि कौशल्प वृद्धी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. राजाराम सॉल्व्हेक्स लि.च्या कर्मचाऱ्यांसाठी ही कार्यशाळा घेण्यात आली.

या उपक्रमात चॅटजिपीटी आणि इतर आधुनिक एआय टूल्सचा वापर कार्यालयीन संवाद, माहिती मिळ वणे, दस्तऐवज व अहवाल लेखन, गुणवत्ता नियंत्रण तसेच सोयाबीनपासून तेल निर्मिती प्रक्रियेतील निरी क्षण, नोंदी आणि कामकाज सुधारणा यांसाठी कसा करता येतो, हे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगण्यात आले.मायक्रोसॉफ्टऑफिस सॉफ्टवेअर्सचा प्रभावी वापर आणि मिटींगची नोंद करणे यासाठी एआय कसा उपयुक्त ठरतो, यावरही भर देण्यात आला. यंत्रसामग्रीची देखभाल



व इंग्रजी संवाद कौशल्य वृद्धी साठीही एआय कसा मदत करू शकतो, हे स्पष्ट करण्यात आले.

या कार्यशाळेत कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभागाचे प्रमुख डॉ. सचिन पाटील यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचे सादरीकरण केले. प्रा. गणेश वेदपाठक आणि प्रा. प्रगती पाटील यांनी एआय चा वापर दर व्यवस्थापन व बियाण्यांच्या गुणवत्ता तपासणीमध्ये कसा करता येतो, याचे मार्गदर्शन केले. प्रा. अपूर्वा मोहिते यांनी मिटींगची नोंद करणे आणि गुणवत्ता व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. ए.ए.जाधव आणि ए.जे.काटे यांनी मायक्रोसॉफ्ट ऑफिस मध्ये एआप चा प्रभावी वापर कसा करता येतो, यावर प्रशिक्षण दिले. प्रा. महेश व्हटकर यांनी यंत्रसामग्रीची देखभाल आणि इंग्रजी संवादासाठी एआय कसा उपयुक्त ठरतो, याची माहिती दिली.

या कार्यशाळेला राजाराम सॉल्व्हेक्सचे व्यवस्थापकीय संचालक व्ही.एम.कर्डीले उपस्थित होते.

त्यांनी राजारामबापू इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या या उपक्रमाचे कौतुक करत, उद्यो गातील कामकाज अधिक प्रभावी करण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांची गरज अधोरेखित केली.कार्यक्रमाचा समारोप प्रा. गणेश वेदपाठक यांच्या आभारप्रदर्शनाने झाला. यावेळी कासेगाव एज्यु केशन सोसायटीचे सचिव प्रा.आर. सावंत आणि राजारामबापू इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. पी.व्ही.कडोले यांचे मार्गदर्शन लाभले.

# आमदारांचेच ठेकेदार ऐकत नाहीत

### वैभव आढाव; तर ही त्यांच्या निष्क्रियतेची पावती

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव मतदारसंघात सध्या निधी उपलब्ध असूनही विकासकामांचा बोजवारा उडालेला आहे. सत्ताधारी आमदारांचे पदाधिकारीच कामे होत नसल्याचे निवेदन देत असल्याने विकास कामे किती अडथळ्यांत अडकली आहेत, हे स्पष्ट होते. जेव्हा खुद्द आमदारांचेच ठेकेदार ऐकत नाहीत, तेव्हा सामान्य जनतेचे काय ऐकणार ? असा प्रश्न उपस्थित करत भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव यांनी जोरदार निशाणा साधला आहे.

नुकतेच नगरपालिकेत आमदारांचे कार्यकर्तेच विकासकामे न झाल्याबाबत तक्रारी करताना दिसले. निधी असूनही ठेकेदार काम करत नाहीत, ही बाब अत्यंत संशयास्पद आहे. मतदारसंघात ठेकेदार कोणाचे आहेत? त्यांना कामे कोण करू देत नाही ? नक्की निधी उपलब्ध आहे की आजवर फक्त हजारो कोटींचा केवळ कांगावा झाला हे जनतेसमोर यायला हवे. केवळ शहरच नव्हे, तर संपूर्ण मतदारसंघातील विकासाचे ऑडिट करणे आता काळाची गरज झाली आहे.अनेक ठिकाणी रस्ते निकृष्ट दर्जाचे का केले आहेत? ठेके मिळवण्यासाठी काही पडद्यामागचे व्यवहार तर कुणी करत नाही ना ? यावर देखील खुलासा होणे आवश्यक आहे. हजारो कोटींचा निधी आला तरी तो नेमका गेला कुठे? निधी असून कामे नसेल होत तर मग तो निधी जातो कुठे असा सवाल करत आढाव यांनी सत्ताधाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

भाजपने युती धर्म पाळत आमदार काळेंना सत्तेत आणले, मात्र त्यांचे कार्यकर्ते जर त्यांच्या विरोधकांची भूमिका घेत असतील आणि कोणी तरी व्यक्ती कामे होऊ देत नाही असे म्हणत असतील, तर याचा अर्थ सत्तेत असूनही आमदार साहेब अस्तित्वात नाहीत असा गैरसमज जनतेत पसरतो आहे.याशिवाय ठेकेदार आमदारांचे ऐकत नसतील तर पाणी कुठे मुरते आहे हे गंभीर आहे. सत्ताधारी मित्रपक्षांचे पदाधिकारी जर असे बेछूट वक्तव्य करत असतील, तर ते प्रत्यक्षात आमदारांच्या निष्क्रियतेची कबुलीच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जर लोकप्रतिनिधींचा प्रशासनावर वचक नसेल, तर मतदारसंघ अडचणीत येतो. अवैध धंदे, गुन्हेगारी आणि जनतेच्या समस्या वाढत असताना सत्ताधारी जर स्वतःच गळा काढत असतील, तर जनतेने काय समजून घ्यावे? असा रोखठोक सवाल करत आढाव यांनी रस्त्यांच्या कामांमागे शिफारशी, संमती आणि काही वेगळे असल्यास त्या व्यवहारांची चौकशी व्हावी अशी अपेक्षा आढाव यांनी व्यक्त केली आहे.

## प्रकाश पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

पोर्ले तर्फ ठाणे येथील माजी जिल्हा परिषद सदस्य श्री प्रकाश सर्जेराव पाटील आण्णा यांनी वाढदिवसा दिवशी पुष्पगुच्छ न स्वीकारता शालेय वह्या स्वीकारून वाढदिवस साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी म्हणून गावातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात येते. प्रकाश पाटील हे माजी जिल्हा परिषद सदस्य आहेत. त्यांच्या कालखंडामध्ये गावाचा विकास म्हणून गावामध्ये प्राथमिक ग्राम ीण रुग्णालय ,मराठी शाळेची भव्य इमारत ,ग्रामपंचायत ऑफिस व व्यापारी संकुल उभा करून गावाचा विकास साधला आहे. अण्णांनी गावचे ग्रामदैवत मसाई देवी मंदिराला ब वर्ग दर्जा मिळवून पाच कोटी रुपये मंदिर व परिसर बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता आणली आहे.पोर्ले गावचे ग्रामदैवत श्री मसाई देवी मंदिर येथे श्री प्रकाश पाटील अण्णा यांच्या वाढदिवसाच्या समारंभ निमित्त सायंकाळी सोनचाफा फुलाचा अभिषेक व महाआरती करून प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी मार्केट समितीचे माजी सभापती परशुराम खुडे, नायकू खवरे ,युवराज कांबळे ,बळवंत साळुंखे इतर मान्यवरांनी वही भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# माणकोबावाडी जि. प.शाळेत पालखी सोहळ्याचे आयोजन

**माणकोबावाडी : हॅलो प्रभात**

आषाढी वारीचे औचित्य साधून माणकोबावाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वृक्ष दिंडी व ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील विध्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी , संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई अशा विविध संतांची वेशभूषा केली होती. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर खताळ आणि सामाजिक कार्यकर्ते मल्हारी बिचकुले यांच्या हस्ते आरती करून पालखीचे प्रस्थान श्री सिद्धनाथ मंदिराच्या दिशेने झाले. जाताना विध्यार्थ्यांनी अभंग गायन केले तसेच वृक्ष लागवडीचे महत्व पटवून दिले. सिद्धनाथ मंदिरात पालखी पोहोचल्यावर आरती करण्यात



आली.

तसेच विध्यार्थ्यांनी विविध अभंगाचे गायन केले. सिद्धनाथ मंदिरातील महिला भजनी मंडळाने विविध भजनांचे गायन केले. यामुळे विध्यार्थी व पालक भक्तीरसात दंग झाले होते. यावेळी फुगडी खेळण्याचा आनंद सर्वांनीच लुटला. तसेच अभंगच्या तालावर अबालवृद्धांनी ठेका धरला होता. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही भाऊसो खताळ यांनी विध्यार्थ्यांना लाडू वाटप केले. तसेच सिद्धनाथ अर्थ मुव्हर्स चे दादा धुळा भिसे यांनी सर्वांना बिस्कीट पुड्यांचे वाटप केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती माने यांनी मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलताना मुख्याध्यापिका स्वाती माने ( हुंबे ) म्हणाल्या कि विध्यार्थ्यांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव यावा, त्यांच्यामध्ये वारकरी सांप्रदायाविषयी आदर निर्माण व्हावा, आपली परंपरा व संस्कृती यांची विध्यार्थ्यांना ओळख व्हावी तसेच वृक्ष लागवडीचे महत्व पटावे, ग्रंथ , पुस्तक वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने असे उपक्रम शाळेत राबविले जातात. संदिप साळवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विक्रम लांडगे यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी देवकरवाडी ग्रामपंचायत माजी सदस्या सरस्वती अनिल देवकर, अंगणवाडी सेविका सुवर्णा शिवतरे , लालूबाई गायकवाड, निलिमा चौधरी, रेणुका कांचन,आशा खताळ, सुस्मिता मोरे, निकिता बिचकुले, कोमल बिचकुले, तृप्ती शिंदे, स्वाती बिचकुले, गौरी शिंदे, शिलाबाई कऱ्हे, तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिखल रस्त्यातून समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आरोग्य सेवा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गडहिंग्लज तालुक्यामधील बड्याची वाडी या गावांमध्य सुंदराबाई सिद्धू दळवी या ९५ वर्षाच्या आजी राहतात त्यांची दोन्ही मुले मुंबईला असतात २४ जून रोजी रात्री त्यांना अशक्तपणाचा त्रास झाला. यावेळी गावातील ग्रामसेवकांनी आवरून आल उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अरुणा तोडकर यांच्याशी संपर्क केला. यावेळी मुख्य रस्त्यापासून गावापर्यंत चिखलीयुक्त रस्ता आहे. या निसरड्या चिखल युक्त रस्त्यामधून वाट काढून समुदाय आरोग्य अधिकारी रुग्णापर्यंत पोहोचले, त्यांच्यावरती उपचार केले आणि बैलगाडी मधून मुख्य रस्त्यापर्यंत पाठविले. तिथून रुग्णास कोल्हापूरच्या सीपीआर रुग्णालयामध्ये ऍडमिट करण्यात आले. या रुग्णास इतर खाजगी डॉक्टरांनी उपचारासाठी बोलविण्यात आले. परंतु रस्ता नसल्यामुळे कुणीही डॉक्टर रुग्णावरती उपचार करण्यास तयार नव्हते. पण समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.अरुणा तोडकर यांनी कर्तव्यास प्राधान्य देऊन चालता येत नसलेल्या चिखलीयुक्त रस्त्यावरून जाऊन रुग्णावरती उपचार केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चाणक्य नीतीअवलंबून जीवन समृध्द बनवा

## महेश सावंत

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

विद्यार्थ्यांनी चाणक्य नीतीनुसार बकोध्यानं, काकचेष्टा , श्वाननिद्रा, अल्पाहारी व गृहत्यागी या पंचसुत्रीचा अवलंब केल्यास ते आपल्या ध्येयापर्यंत जावुन त्यांचे जीवन समृध्द होईल. विद्यार्थी दशेतील उर्जा प्रचंड असते, मात्र या उर्जेला योग्य दिशेने वळवा, असा सल्ला कोपरगांवचे तहसिलदार श्री महेश सावंत यांनी दिला. संजीवनी युनिव्हर्सिटी अंतर्गत स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलाजी मध्ये इ. १० वी नंतर सहा वर्षे अभ्यासक्रमाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरींगला नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या स्वागत समारंभात श्री सावंत प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते. विद्यापीठाचे प्रसिडेंट श्री अमित कोल्हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी आय सोर्स इन्फोसिस्टिम प्रा. लि. च्या कार्पोरेट हेड व ट्रेनर श्रीमती मंजिरी कुलकर्णी, विद्यापीठाचे व्हाईस चांसलर डॉ. ए.जी. ठाकुर, डीन डॉ. कविथा राणी पी., आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी डॉ. ठाकुर व डॉ. कविथा राणी पी. यांनी उपस्थितांचे स्वागत करून कोर्स बध्दल माहिती देत नियमावली सांगीतली तसेच भविष्यातील संधी सांगीतल्या. श्री सावंत यांनी पंचसुत्रीचे विश्लेषण



करत या पंचसुत्रीचा विद्यार्थ्यांनी कसा अवलंब करावा, हे स्पष्ट केले. बकोध्यानं म्हणजे बगळा पाण्यात एक पायावर उभा राहतो व मासा पकडण्यावर लक्ष ठेवतो, तसे विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले पाहीजे. काकचेष्टा म्हणजे कावळा नवीन जाणुन घेण्याची तिव्र इच्छा ठेवतो, तसे विद्यार्थ्यांनी हिताच्या नवीन बाबी माहिती करून घेणे गरजेचे आहे. श्रीमती कुलकर्णी म्हणाल्या की जीवनात चांगल्या मित्रांचे जाळे निर्माण करावे. अनुभवांच्या चटक्यांनी माणुस मोठा होत असतो, त्यासाठी सकारात्मक रहा. प्रत्येक समस्येला पर्याय असतात. म्हणुन धीर व संयम सोडू नका. भविष्यात मुलाखतीसाठी तसेच वरिष्ठ व्यक्तिंशी संवाद साधताना आपले भाषा कौशल्य, देहबोली, संवादातील आवाजाची पातळी आणि योग्य शब्द फेक या बाबी महत्वाच्या आहेत. पैसा कमवता येतो परंतु गेलेली वेळ पुन्हा मिळत नाही म्हणुन विविध गुणात्मक बाबी आत्मसात करताना वेळेचे नियोजन करा. वास्तव स्वीकारून त्यानुसार बदल करा. शिकत राहणे ही निरंतर प्रक्रिया आहे.अध्यक्ष स्थानावरून बोलताना श्री अमित कोल्हे म्हणाले की सुमारे ४२ वर्षांपूर्वी स्व. शंकरराव कोल्हे यांनी ग्रामीण भागातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी संजीवनी संकुलाची स्थापना केली. त्यामुळे आज जगभर संजीवनीचे माजी विद्यार्थी कार्यरत आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी अंतर्गत विविध संस्था वाटचाल करीत आहेत.त्यांच्या संकल्पनेतुन येथिल प्रत्येक बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याने तीन पर्यायांपैकी एक पर्याय निवडून स्वावलंबी व्हावे, यासाठी प्रयत्न केले जातात. पहिला पर्याय नोकरी, दुसरा पर्याय उच्च शिक्षण आणि तिसरा पर्याय स्वतःचा व्यवसाय. प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी पुढील सहा वर्षे चांगला अभ्यास करून सर्व बाबतीत सहभाग नोंदवावा. त्यांची पुढील ६० वर्षे आनंदात जातील.शेवटी रजिस्ट्रार प्रा. अमोल ढाकणे यांनी आभार मानले.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली,कोल्हापूर,सातारा,सोलापूर,पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ३000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | ७५00/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976